**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १७ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **'नारी शक्ती वंदन अधिनियम' आजपासून लागू झाल्याची अधिसूचना जारी.**
2. **'नारी शक्ती वंदन अधिनियम' विधेयके संसदेत आणून निवडणुकीचा नकाशा बदलण्याचा प्रयत्न असल्याचा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा संसदेत आरोप.**
3. **अमरावतीमधे मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणात व्हिडीओ अपलोड करणाऱ्यांची चौकशी करण्याचे राष्ट्रीय महिला आयोगाचे पोलिसांना निर्देश.**
4. **उष्णतेच्या लाटेमुळे उद्या नागपुरात शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर; विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात पारा 40 अंश सेल्सिअसच्या वर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

नारी शक्ती वंदन अधिनियम'

१०६ वी घटना दुरुस्ती अधिनियम २०२३ म्हणजेच 'नारी शक्ती वंदन अधिनियम' आजपासून लागू झाल्याची अधिसूचना जारी झाली आहे. २०२३ मध्ये संसदेने हा कायदा संमत केला. या कायद्यामुळे लोकसभा आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्राच्या विधानसभांसह सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा फिरत्या पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद या कायद्यात आहे. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये संस्कृत सुभाषितातून 'नारी शक्ती'ची ताकद आणि योगदान अधोरेखित करताना नमूद केले की,'नारी शक्ती' हेच एका सशक्त भारताचे वैशिष्ट्य असुन देशातील माता, भगिनी आणि कन्या आज आपल्या अटूट संकल्पाने, निष्ठेने आणि सेवाभावाने प्रत्येक क्षेत्रात 'भारतवर्षा'चा गौरव वाढवत आहेत. दरम्यान, यापूर्वी लागू न झालेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी नारी शक्ती वंदन अधिनियम विषयीची अधिसूचना जारी करण्यात आल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले. संसद परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. विरोधी पक्षांनी या प्रकरणाचं राजकारण करू नये असं आवाहनही रिजिजू यांनी केलं.

विधेयकावर मतदान

लोकसभेत संविधान (एकशे एकतीसवी दुरुस्ती) विधेयक, २०२६, परिसीमन विधेयक, २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६ यांवर आज चर्चा पुन्हा सुरू झाली. या तीन विधेयकांचा उद्देश लोकसभा आणि राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे हा आहे. चर्चेत सहभागी होताना, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी म्हणाले की, 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हे महिला आरक्षण विधेयक नाही आणि त्याचा महिला सक्षमीकरणाशी काहीही संबंध नाही. त्यांनी दावा केला की, ही विधेयके संसदेत आणून निवडणुकीचा नकाशा बदलण्याचा हा प्रयत्न आहे.

आपल्या भाषणादरम्यान गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह व्यक्तव्य केल्याच्या मुद्द्यावरून संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या व्यक्तव्याबद्दल राहुल गांधींनी माफी मागावी आणि त्यांच्या भाषणातून अशी वक्तव्ये वगळण्याची मागणी केली. लोकसभेत सरकारने सादर केलेल्या तीन विधेयकांना पाठिंबा देताना केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिला केवळ देशाच्या विकास प्रवासातील सहभागी नाहीत, तर राष्ट्राचे भविष्य घडवणाऱ्या प्रमुख निर्णयकर्त्या देखील आहेत. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात वापरलेल्या असंसदीय शब्दांचा मंत्र्यांनी निषेध केला. दरम्यान या तीनही विधेयकावर चर्चा सध्या चालु आहे.

प्रतापराव जाधव

खामगाव-जालना रेल्वे मार्गाच्या अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय आयुष मंत्री तथा बुलडाण्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची आज नवी दिल्लीत भेट घेतली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत तत्वतः मान्यता मिळाली असून राज्य सरकारने ५० टक्के निधीची तरतूद केली आहे. उर्वरित निधीसाठी प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला असून रेल्वे मंत्रालयाने तो अर्थ मंत्रालयाकडे पाठवला आहे. या रेल्वे मार्गामुळे बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाला मोठी गती मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. प्रतापराव जाधव यांनी २००९ पासून सातत्याने पाठपुरावा करून या प्रकल्पाला पुढे नेले आहे. अंतिम मंजुरीबाबत लवकरच सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे.

अमरावती छळ प्रकरण

अमरावतीमधे मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणातल्या पीडितांचे व्हिडीओ समाज माध्यमांवरुन काढून टाकावे आणि व्हिडीओ अपलोड करणाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश राष्ट्रीय महिला आयोगानं पोलिसांना दिले आहेत. याप्रकरणी वेळेत चौकशी पूर्ण होऊन कठोर कारवाई करण्याचे निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी पोलिस महासंचालकांना दिले आहेत. याप्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवालही आयोगानं ५ दिवसात मागवला आहे. दरम्यान, माजी खासदार नवनीत राणा यांच अमरावती प्रकरणी वक्तव्य हिंदू-मुस्लिम दरी वाढवणारी असल्याचं मत अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनीं व्यक्त केलं -

दरम्यान या घटनेच्या चौकशीसाठी परतवाडा येथे आयोगातर्फे पथक पाठवण्यात आले होते. असे खान यांनी सांगितल.

हवामान

हवामान! देशाच्या विविध भागात तापमान वाढत आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात उष्णतेची लाट आहे. विदर्भात सूर्याचा पारा चांगलाच चढला असून, हवामान विभागाने नागपूर जिल्ह्यासाठी हिट-वेव्ह म्हणजेच उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. याच पार्श्वभूमीवर नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उद्या १८ एप्रिल शनिवार, रोजी नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली असून जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या आदेशानुसार, हा नियम नागपूर जिल्हा सीमा क्षेत्रातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि सर्व कोचिंग क्लासेस या सर्व संस्थांना लागू असेल. वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी उपाय योजना करण्याचे आवाहन नागपुर प्रादेशिक हवामान केंद्राचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी केलं आहे -

दरम्यान, विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम असून अनेक ठिकाणी तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. अकोला येथे ४३ पूर्णांक ३ अंश सेल्सियस, अमरावती ४३ पूर्णांक २ अंश, चंद्रपूर ४३ पूर्णांक ४ अंश , गडचिरोली ४३ पूर्णांक ६ अंश , नागपूर ४३ अंश, तर वर्धा येथे सर्वाधिक ४४ पूर्णांक.१ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. गोंदिया येथे तापमान तुलनेने कमी असून ४१ पूर्णांक.४ अंश सेल्सियस इतके नोंदवले गेले. नागरिकांनी उष्माघात टाळण्यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ई-बस सेवा

अकोला शहरातील नागरिकांसाठी पर्यावरणपूरक ई-बस सेवा सुविधा लवकरच उपलब्ध होणार आहे. यासाठी ई-बस चार्जींग सेटर आधुनिक पद्धतीने उभारण्याकरीता कौलखेड येथील जागा निश्चित करण्यात आली असून, महापौर शारदा रणजीत खेडकर यांनी या जागेची पाहणी केली. या चार्जिंग सेंटरचे काम अंतिम टप्प्यात असून, काही दिवसांतच अकोला शहरात नागरीकांसाठी लवकरच ई-बस सेवा सुरू करण्यात येणार आहे.

तक्रार निवारण शिबिर

नागपूर जिल्ह्यात सौर कृषीपंपांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यासाठी महावितरणतर्फे २० ते २३ एप्रिलदरम्यान विशेष तक्रार निवारण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तांत्रिक बिघाड, पॅनेल नुकसान, अपूर्ण स्थापना यांसह

विविध समस्यांवर जागेवरच तोडगा काढला जाणार आहे.या शिबिरांमध्ये अभियंते आणि संबंधित एजन्सींचे प्रतिनिधी उपस्थित राहून तक्रारी निकाली काढणार आहेत. शेतकऱ्यांनी एमटीआयडी क्रमांक आणि  आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.दरम्यान, गेल्या आर्थिक वर्षात महावितरणच्या भरारी पथकांनी विदर्भात २,९३४ वीजचोऱ्या उघडकीस आणून ४७ वीज चोरीचा पर्दाफाश केला आहे.

*****